"मा.विधानमंडळ / संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबत"

महाराष्ट्र शासन

# परिपत्रक

**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
**परिपत्रक क्रमांक २०२६/विकास (आस्थापना)/संकीर्ण/प्र.क्र.७७२,**
**फाजीलपूरा, दिल्ली गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर – ४३१००१.**
**दिनांक : ०४ मार्च, २०२६**

**प्रस्तावना :**

मा.विधानमंडळ व संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ मधील मार्गदर्शक तत्वांचे / सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ नुसार बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने या स्तरावरुन परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित करण्याचे विचाराधीन होते. करीता खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**:परिपत्रक:**

सन्माननीय विधानमंडळ सदस्य / संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक मिळण्यासंदर्भात सर्व विभागीय कार्यालय तसेच जिल्हा परिषद नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / जिल्हा प्रमुख / कार्यालय प्रमुख / शासकीय कार्यालये / अधिकारी / कर्मचारी यांना उक्त तत्वांचे / सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत:

१. **तत्वांचे / सूचनांचे पालन:**
शासन परिपत्रक दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ मधील सर्व मार्गदर्शक तत्वांचे / सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

२. **शिस्तभंगाची कारवाई:**
सदर तत्वांचे / सूचनांचे उल्लंघन, टाळाटाळ किंवा कुचराई केल्याचे निदर्शनास आल्यास, त्याची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुद्ध, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० (२) व (३) अनुसार तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

26. 71

जिल्हा परिषद, बीड.
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक 13 MAR 2026
विभाग EST-5

(जितेंद्र पापळकर भा.प्र.से.)
विभागीय आयुक्त
आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलीपी,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर विभाग** यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक हे आपले जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे लेखी निदर्शनास आणून देण्यात यावे. तसेच आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर सदर परिपत्रक कायम उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावी.